Saturday, March 29, 2025
1:05 PM

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २९/०३/२०२५

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | खो गेट अप क्र ३७/२० २५ कलम ११८(१) भारतीय न्याय संहीता . | पो स्टे खो गेट अमरावती | २७/०३/२५ चे २१/०० वा दरम्याण दाखल २८/३/२५ चे ०१-३८ वा | रितेश सुनिल कानकिरड वय २२ वर्ष रा हनुमान नगर अमरावती | देवेश महादेवराव पारडे वय २० वर्ष रा महाजनपुर ा अमरावती | हकिकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे मित्र असुन यातील फिर्यादी चे मित्राचे वाढदिवस साजरा करित असतांना यातीलआरोपी सुध्दा नमुद घटना ता वेळी व ठिकाणी तेथे आला व आरोपीचे गाडीच्या सिट ला केक लागल्या मुळे फिचे मित्रानी आरोपीचे गाडीचे सिट पुसली व मित्राणी सुध्दा केक लागल्याने सिट पुसुन दिली तर यातील आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळ केली तर फिर्यादी याने त्यास शिवीगाळ करण्यास मनाई केली असता आरोपी याने हातातील स्टील च्या कडयाने फिचे डोक्यावर मारले व फि च्या डोक्याला जखम झाली होवुन रक्त निघाले व फिहयास वाचविण्या करीता विक्की ईवनाते हा आला असता त्याला सुध्दा आरोपीने डोक्याला मारले वरुन रक्त निघु लागले आमचे दोघांना आरोपी याने जखमी केल्यो रिपोर्ट दिला व मेडी सर्टीवरुन सदर चा गुन्हा दाखल |

➢ वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पो.स्टै. नांदगाव पेठ अपक्र. 108/2025 कलम 305(ब) भा न्यास | संकल्प कॉलणीदेशमुखलॉनच्या मागेअमरावती | 23/03/2025 चे 20.00 वाते 24/03/2025 चे 05.00 वा दाखल 28/03/2025 चे 12.02 वा | रुपेशसुभाष आटोळेवय 32 वर्षेरा. संकल्पकॉलणीदेशमुख लॉनच्यामागेअमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, फि. हे नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फि. ची मो. सा. होन्डा शाईन ग्रे कलरची गाडी क्र. MH 27DB 1064 संकल्प कॉलणी देशमुख लॉन च्या मागे च्या पार्किग मध्ये उभी करुन गेले असता दि24/03/2025 चे 05.00 वा परत आल्यावर पाहीले असता गाडी जागेवर उभी दिसली नाही म्हणुन फि. ने गाडीचा आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आली नाही.कि. 50,000/-रु कोणी तरी अज्ञात चोराने चोरुन निली वरुन सदर चा फि. च्या जबानी रिपोर्ट वरुनसदरचा गुन्हादाखल |

जबरी चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र २५८/२०२५ कलम ३११ **BNS** | डॉ राजेन्द्र गोडे वैद्यकिय महाविद्यालय कडे जाणारा घातखेडा रोड अमरावती | दि.२८/०३/२०२५ चे १७.१५ वा दि.२८/०३/२०२५ चे २२.०४ वा | वेदान्त गिरीष मानमोडे वय १९ वर्ष व्यवसाय फोटोग्राफी रा बुधवारा अंबागेट अमरावती | ५ ते ६ अनोळखी इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि यास व्हिडीओ शुटींगची माहिती असल्याने त्याचा मित्र नामे संस्कार कुमोद साहु वय १९ वर्ष याचेसह रिल बनवायचे काम करतो. दि.२८/०३/२०२५ रोजी दुपारी ०१.३० वा संस्कार ने फोन वर म्हटले की, ०४.०० वा घातखेडा या गावी शुटींगसाठी जायचे आहे म्हणुन फि त्याचेसह गाडी क्र **MH** २७ **CJ** ७६४७ ने ५.०० वा सुमारास घातखेडा गावी जाणे करीता निघाले फि गाडी चालवित असताना संस्कार हा कॅमेराची बॅग घेवुन मागे बसलेला होता. डॉ राजेन्द्र गोडे वैद्यकिय कॉलेज कडे जाताना पाठीमागुन ४ मो सा वर बसुन अंदाजे ५ ते ६ इसम मो सा पाठीमागुन येवुन फि चे गाडीला पाठीमागुन पल सर गाडीवाल्याने धडक देवुन खाली पाडले त्यांचे सोबत निळया रंगाच्या ॲक्टीव्हा गाडीवरील एका इसमाने चाकु काढुन चाकुची मुठ संस्कारच्या डोक्यावर व उजव्या गालावर मारुन त्याचे जवळील कॅमेराची बॅग हिसकावुन ते सर्व अमरावती च्या दिशेला पळुन गेले ते सर्व इसम तोंडाला दुपट्टा बांधुन असल्याने त्यांचा चेहरा दिसला नाही त्यांनी फि चा मित्र संस्कार ला म्हटले की, तेरेपास जो कुछ है वो हमको दो.त्यांच्याजवळील बॅग्मध्ये कॅमेरा किं अं २,००,०००/-रु , लेन्स किं अं ५०,०००/-रु, **LC** लाईट किं अं १०,०००/-रु असा एकुण २,६०,०००/-रु चा माल सदर इसम घेवुन पळुन गेले अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र २५७/२०२५ कलम ७४,७५,२९६,११५(२), ३५१(२) BNS | अमरावती | दि. २३/०३/२०२५ चे २३.०० वा. दि.२८/०३/२०२५ चे १७.०४ वा. | एक महिला | अविनाश श्रीरामपंत लव्हाळे वय ५० वर्ष रा एल आय सी कॉलनी प्रशांत नगर गार्डन जवळ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी चे पती व आरोपी यांच्यामध्ये पैशाचे व्यवहार होते व फि त्यांना ओळखते, नमुद घटना ता वेळी आरोपी हा फि चे पतीला पैसे मागण्याकरीता आला असता फि चे पती घरी नसल्याने फि ने दरवाजा उघड ला नाही म्हणुन आरोपीने घराचा दरवाजा लोटुन म्हटले की, बाहेर निघ असे म्हटले म्हनुन फि ने दरवाजा उघडला व म्हटले की, माझे पती घरी नाही तुम्ही नंतर या असे म्हटले असता आरोपीने फि चे छातीला हात लावुन लोटले त्यामुळे फि चे ब्लाऊज फाटले व जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला, नंतर फि ची सासु मध्ये आली असता त्यांना सुद्धा थापडांनी मारहान करुन लोटले व तुमचे सगड्याचे कोरे धनादेश माझ्याकडे असुन मी तुम्हाला खोट्या प्रकरणात फसवितो असे म्हटले फि ने आरडा ओरड केल्याने आजुबाजुचे लोक आल्याने तो तेथुन निघुन गेला. फि ने पतीस झालेली घटना सांगितली असता पोलीस स्टेशन ला रिपोर्ट देण्यास सांगितले म्हणुन फि मुलासह रिपोर्ट देण्यास आली परंतु फि घाबरलेली असल्याने पुर्ण हकीकत सांगितली नाही व एन सी तक्रार दिली आज पती व सासु सोबत बोलुन पो स्टे ला तक्रार देण्यास आली अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

प्रेव्हिशन :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पोस्टे वलगाव | अप क्र.80/2025 क. 65 ई म.दा.का. | ग्राम अनकवाडी | दि. 28/03/2025 चे 18/45 वा. | दि. 28/03/2025 चे 20/56 वा. | **पोउपनि भारती मामनकर पोस्टे वलगाव अम.शहर.** | सुधिर ज्ञानेश्वर भिसे वय 46 वर्ष रा. ग्राम अनकवाडी ता.भातकुली जि.अमरावती. | हकिकत अशा प्रकारे आहे कि, नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी यांची पोस्टे ला हजर ड्युटी असतांना गुप्त बातमी दारा कडुन माहीती मिळाली कि, ग्राम अनकवाडी येथील ईसम नामे सुधिर ज्ञानेश्वर भिसे हा त्याचे राहते घरा समोज देशी दारु चि विक्री करत आहे. अशा माहीती वरुन सदर ईसमावर प्रो रेड करणे करीता सोबत पो.स्टाफ व पंच असे ग्राम अनकवाडी येथे गेलो असता. आमचे वाहन बाजुला ठेवुन दुरुनच पाहनी केली असता. तिशे एक ईसम हा लोकांच्या गर्दित त्याचे हातात असलेली कापडी पिशवि तुन काढुन लोकांना देशी दारु च्या पावट्या देतांना दिसला वरुन त्याचे वर प्रो रेड केली असता. दारु पिनारे लोक पोलीसांना पाहुन पळुन |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | गेले व दारु विक्री करणारा ईसम याला जागेवर पकडुन त्याचे हातातील पिशवीची पाहनी केली असता. त्या मध्ये देशी दारु बाँबी संत्राच्या 10 पावट्या 90 मीली कि.अ. 350/रु चा माल मिळुन आला सदर ईसमाला त्याचे नाव गाव विचारले असता. त्याने त्याचे नाव सुधिर ज्ञानेश्वर भिसे वय 46 वर्ष रा. अनकवाडी असे सांगितले सदर ईसमाचे हे कृत्य कलम 65 ई नुसार होत असल्याचे त्याचे विरुद्ध माझी कायदेशीर फिर्याद आहे. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |